नियमित दिवाणी मुकदमा क्र. १६५/२०१२
नि. ९१

वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा शपथेवर जबाब
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव— राघोबा वडीलांचे/पतीचे नांव — नारायण पोपकर
वय सुमारे ७९ वर्षे, धंदा— सेवानिवृत्त
रा. इन्सुली, क्षेत्रफळ, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.

<u>सरतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. आर.एस्.गव्हाणकर यांचेतर्फे</u>

१. महादेव गिरी हे नांव माझ्या आता लक्षात नाही. महादेव गिरी यांनी जे बक्षिसपत्र केले होते त्यावर मी साक्षीदार म्हणून स्वाक्षरी केली होती. दु.निबंधक सावंतवाडी यांच्या कार्यालयाच्या बाजुला माझे कार्यालय होते. त्या कार्यालयातील सर्व स्टॅम्प व्हेंडर माझ्या ओळखीचे होते. स्टॅम्प व्हेंडर यांनी मला सही करण्यास सांगितली त्याप्रमाणे मी बक्षिसपत्रावर सही केलेली आहे. त्या व्यतिरिक्त मला त्यातील काहीही माहिती नाही. ती सही मी किती तारखेला केली हे मला सांगता येणार नाही. मी कोणत्याही व्यक्तीला पाहिलेले नाही.

<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री. पी.डी. देसाई यांचेतर्फे</u>

२. मला ज्या स्टॅम्प व्हेंडरने सही करण्यास सांगितली त्याचे नांव कुडाळकर असे होते. जे.एस्. शिवलकर या नांवाची व्यक्ती मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय कार्यालयात कामावर असताना कोणत्याही कागदावर स्वाक्षरी करू नये असा नियम आहे हे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, नोकरी अडचणीत येवू नये म्हणून मी कागदांवर स्वाक्ष—या करीत नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, ज्या कागदावर मी स्वाक्ष—या करायचो तो कागद मी वाचून पहात होतो. हे म्हणणे खरे आहे की, माणसे माझ्या ओळखीची असल्यावरच मी सही करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणत्याही कागदावर सही केलेली नाही.

उलटतपास संपला.
फेरतपास नाही.

<u>उलटतपास प्रतिवादी क्र. २ एकतर्फी—सबब उलटतपास नाही.</u>

<u>उलटतपास प्रतिवादी क्र. ३ तर्फे विधिज्ञ श्री. पी.एस्.प्रभूआजगांवकर यांचेतर्फे</u>

प्रतिवादी क्र.३ व विधिज्ञ पुकारता गैरहजर. सबब त्यांचेतर्फे उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/—
(एम्.एस्.बुधवंत)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी

दिनांक :— १६/०८/२०१८.